राज्यातील माहे जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित व सन २०२२ मध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणूका न होऊ शकलेल्या **सुमारे २२८४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक** तसेच निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य /थेट सरपंचाच्या **रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा सुधारीत मतदार यादीचा कार्यक्रम .....**

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.१२/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- २७/०७/२०२३

**प्रति**
**जिल्हाधिकारी** *(सर्व),*
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय :-** राज्यातील माहे जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित व सन २०२२ मध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणूका न होऊ शकलेल्या **सुमारे २२८४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक** तसेच निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य /थेट सरपंचाच्या **रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम .....**

संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकांचे दिनांक ०६/०७/२०२३ चे आदेश

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० अ(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून आयोगाच्या संदर्भाधीन आदेशान्वये राज्यातील माहे जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित व सन २०२२ मध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणूका न होऊ शकलेल्या **सुमारे २२८४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक** तसेच निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य /थेट सरपंचाच्या **रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकांसाठी संगणक प्रणालीव्दारे** राबविण्यात यावयाचा खालीलप्रमाणे मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला आहे.

मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक शनिवार दि.०१/०७/२०२३

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार | दिनांक ३१/०७/२०२३ |
| २) | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | सोमवार<br>सोमवार | दिनांक ३१/०७/२०२३ ते<br>दिनांक ०७/०८/२०२३ पर्यंत |
| ३) | प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | शुक्रवार | दिनांक ११/०८/२०२३ |

राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये अतिवृष्टीमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेता, खालीलप्रमाणे सुधारीत मतदार यादी कार्यक्रम देण्यात येत आहे.

**मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक ०१/०७/२०२३**

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय **प्रारूप मतदार यादी** प्रसिध्द करण्याचा दिनांक | गुरुवार दिनांक १०/०८/२०२३ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | गुरुवार दिनांक १०/०८/२०२३ ते<br>सोमवार दिनांक २१/०८/२०२३ पर्यंत |
| ३ | प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | शुक्रवार दिनांक २५/०८/२०२३ |

सदर मतदार यादी कार्यक्रमानुसार **पारंपारिक पध्दतीने मतदार याद्या तयार** करण्यात याव्यात.

आयोगाच्या दिनांक ०६/०७/२०२३ रोजीच्या आदेशातील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( के. सुर्यकृष्णमूर्ती )
प्र.सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-१. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या ग्रामपंचायतींबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच या ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते अनुदान तात्काळ वितरित करण्याची व्यवस्था करावी.

२. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

३. सर्व विभागीय आयुक्त

**यांना कळविण्यात येते की, आपल्याकडे प्रलंबित असलेल्या अनर्हतेच्या प्रकरणांमध्ये पोटनिवडणूक कार्यक्रम सुरु झाल्यानंतर कोणत्याही प्रकारे स्थगिती देण्यात येऊ नये.**

४. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.
५. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

**मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती प्रमाणित करून उपलब्ध करून देण्याचे तसेच जिल्हा व तालुक्याच्या महसूल प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय साधण्याचे निर्देश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना देण्यात यावे व या निर्देशांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल, याची दक्षता व्यावी.**

७. संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
८. कक्ष अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.
९. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.
१०. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.
११. निवड नस्ती.